# जिल्हा परिषद, गडचिरोली

## काम वाटप समिती सभा दिनांक- 14 जुन 2021

परिपत्रक/जिपग/बांधवि/निविदा/2584/2021 दिनांक- 05/07/2021 14/7/2021

---

## परिपत्रक

सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक- 26 नोव्हेंबर 2014 च्या शासन निर्णयानुसार व ग्राम विकास विभागाच्या दिनांक- 27 मे 2015 रोजी शासन निर्णयात नमुद केले नुसार रुपये 3.00 लक्ष रक्कमेवरील जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्राम पंचायत स्तरावरील विविध विकास कामाचे ई निविदा पद्धतीने करण्याबाबत सुचना देण्यात आलेले आहेत. ग्राम विकास विभाग शासन निर्णय दिनांक- 27 मे 2021 अन्वये जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्राम पंचायत स्तरावरील रुपये 10.00 लक्ष चे वरील (सर्व कर अंतर्भुत करुन) विविध विकास कामाचे ई निविदा करण्याबाबत सुचना निर्गमित केलेले आहे.

ग्राम विकास विभाग शासन निर्णय दिनांक- 27 मे 2021 च्या शासन निर्णयाचे विचार विमर्श करण्याकरिता दिनांक- 14 जुन 2021 काम वाटप समिती जिल्हा परिषद गडचिरोली यांची सभा घेण्यात आली. या सभेमध्ये ग्राम विकास विभाग शासन निर्णय दिनांक- 19 ऑक्टोबर 2011, शासन पुरकपत्र दिनांक- 05 जानेवारी 2013, शासन निर्णय दिनांक- 27 मे 2015, शासन निर्णय दिनांक- 27 मे 2021 च्या अधिन राहुन सुधारित काम वाटप पद्धतीचा अवलंबन करण्याचे ठरवले.

**काम वाटप समिती मार्फत सुधारित काम वाटप कार्यप्रणाली पुढील प्रमाणे :-**

1) **रुपये 1.00 लक्ष ते 5.00 लक्ष पर्यंतची कामे लॉटरी पद्धतीने 33:33:34 प्रमाणात वाटप करणे.**
2) **रुपये 5.00 लक्ष ते 10.00 लक्ष (सर्व कर अंतर्भुत करुन) पर्यंतची कामे 33:33:34 प्रमाणात स्पर्धात्मक ऑफलाईन पद्धतीने वाटप करणे. ( बंद लिफाफा मध्ये कामे निहाय दरपत्रक सादर करणे )**
3) **रुपये 10.00 लक्ष ते 30.00 लक्ष पर्यंतची कामे 33:33:34 प्रमाणात स्पर्धात्मक ई निविदा कार्यप्रणाली पद्धतीने वाटप करणे.**
4) **रुपये 30.00 लक्ष वरील सर्व कामे खुला कंत्राटदार यांचेकरिता स्पर्धात्मक ई निविदा कार्यप्रणाली पद्धतीने वाटप करणे.**

काम वाटप समिती सभा दिनांक- 14 जुन 2021 अन्वये वरील प्रमाणे कामे वाटप करण्याचे सुचना देण्यात आलेले आहेत. तरी जिल्हा परिषद गडचिरोली अंतर्गत यापुढे वरील कार्यप्रणाली प्रमाणे सुचनांचे पालन करणे अनिवार्य राहील. तरी यापुढे सर्व विभाग प्रमुखांनी सदर काम वाटप कार्यप्रणाली व निविदा कार्यवाहीचा आपल्या स्तरावरुन अवलंबन करण्यात यावे.

मुळ प्रत -

**( फरेंद्र कुतीरकर )**
**अध्यक्ष काम वाटप समिती**
**तथा अप्पर मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद,गडचिरोली**

प्रति,

1) **मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद गडचिरोली**
2) **मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली.**
3) **कार्यकारी अभियंता / उपविभागीय अभियंता ( बांधकाम, ग्रामिण पाणी पुरवठा, लघु पाठबंधारे ), जिल्हा परिषद,गडचिरोली.**
4) **मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली.**
5) **जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, जिल्हा गडचिरोली.**
6) **जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा- गडचिरोली**
7) **गटविकास अधिकारी, पंचायत समिती ---------------- (सर्व), जिल्हा परिषद गडचिरोली.**
8) **नस्ती**